TRTI
तदेव मे कल्याणम्
MAHARASHTRA STATE
PUNE
Email ID- trti.pvtg@gmail.com
Website-www.trti.maharashtra.gov.in

महाराष्ट्र शासन
**आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था**
२८, क्वीन्स गार्डन, पुणे-४११००१

दूरध्वनी क्र. ०२०/२६३३३७४३

---

जा.क्र./आ.ज.क./प्र.क्र.०४/४(अ)१/ ३०२४

दि०७ऑक्टोबर,२०२४

## निविदा/दरपत्रक मागणी सुचना

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, २८ क्वीन्स गार्डन, पुणे-४११००१ या कार्यालयातून ९८५ शब्दकोश आदिवासी विकास आयुक्तालय, आदिवासी विकास भवन, जुना आग्रा रोड, गडकरी चौक, नाशिक-४२२००२ या कार्यालयास पोहोच करावयाचे आहेत. सदर शब्दकोशाचे अंदाजित वजन १८२७.१२७ कि.ग्रॅ.इतके आहे.

त्याकरिता खाजगी वाहतूकदार यांचेकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत. त्याबाबतच्या अटी, शर्ती खालीलप्रमाणे असतील.

१. या कार्यालयातून आयुक्तालय नाशिक कार्यालयास शब्दकोश पोहच करताना स्वत:च्या मनुष्यबळामार्फत शब्दकोशांचे लोडीग अनलोडींग करणे.

२. सादर करण्यात येणारे दरात वाहतूक, जकात, लोडीग, अनलोडींग, GST, अन्य कर इ. सर्व बाबींचा समावेश असावा. त्यासाठी बाब निहाय वेगळा खर्च अनुज्ञेय राहणार नाही.

३. सादर करण्यात येणारे दरपत्रक पुरवठादार / वाहतूकदार यांच्या लेटरहेडवर असणे बंधनकारक राहील. सदर लेटरहेडवर VAT/CST/ GST नोंदणी क्रमांक, दूरध्वनी क्रमांक, संपुर्ण पत्ता, सपर्क व्यक्ती नाव व भ्रमणध्वनी क्रमांक इ. माहिती नमूद असणे अनिवार्य राहील.

४. एका पुरवठादार तथा वाहतूकदारास एकच दरपत्रक सादर करण्याची मुभा असेल. एकापेक्षा अधिक दरपत्रके सादर केल्यास एकही दरपत्रक विचारात घेतले जाणार नाही.

५. सादर करण्यात येणारे दरपत्रक या निविदा/दरपत्रक मागणी सुचनेच्या प्रसिध्दी दिनांकापासून ७ दिवसांत या कार्यालयास सादर करावे लागेल. मुदतीनंतर प्राप्त दरपत्रक अथवा दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत.

६. विहीत मुदती अखेर प्राप्त एकुण दरपत्रकातून तुलनात्मकदृष्ट्या न्यूनतम (एल-१) ठरणारे दरपत्रक मान्य करण्यात येईल. सदर यशस्वी दरपत्रकधारकास पुरवठा/कार्यारंभ आदेश देण्यात येईल.

७. कार्यारंभ आदेश प्राप्ती नंतर यशस्वी दरपत्रकाधारकाने विहीत मुदतीत शब्दकोश पोहच करुन या कार्यालयास आयुक्तालयास शब्दकोश प्राप्त झाल्याबाबतची पोहच व द्विप्रतीत देयक/बील सादर करणे बंधनकारक राहील. सदर पोहचसह देयक प्राप्त झाल्यानंतरच देयकाची रक्कम अदायगी अनुज्ञेय राहील.

वरीलप्रमाणे अटीशर्ती मान्य असलेल्या उत्सुक पुरवठादार तथा वाहतूकदार यांनी आगामी ७ दिवसांत या कार्यालयास शीलबंद लिफाफ्यात आपले दरपत्रक सादर करावेत.

(डॉ.राजेंद्र भारुड,भा.प्र.से.)
**आयुक्त,**
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
पुणे.